**ठळक बातम्या**

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत पुण्यात पश्चिम विभागीय परिषदेची बैठक

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी उपराष्ट्रपती जगदीप धनखड छत्रपती संभाजीनगरमध्ये

- जालन्यात वाळूच्या ढिगाऱ्या खाली दबल्यानं ५ मजूरांचा मृत्यू

**आणि**

- भारतीय धावपटू गुलवीर सिंगकडून ५ हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत नवा आशियाई विक्रम

**<><><><><>**

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज पुण्यात गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेची २७ वी बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, दादरा नगर हवेली आणि दीव दमणचे प्रशासक प्रफुल पटेल आणि या क्षेत्रातल्या राज्यांचे इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या पुणे जिल्ह्यातल्या लाभार्थ्यांना अमित शहा यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात मंजुरी पत्र वितरण दिलं जाईल. तसंच राज्यातल्या १० लाख लाभार्थ्यांना या योजनेच्या पहिल्या हप्त्याचं वितरणदेखील यावेळी करण्यात येईल.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६५व्या दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. पीएम उषा प्रकल्पातंर्गत बांधण्यात आलेल्या विद्यापीठाच्या चार इमारतींचं भूमिपूजन, तसंच संविधान जागृती वर्षाच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमाचं उद्घाटनही उपराष्ट्रपती करणार आहेत. या दौऱ्यात वेरुळ लेणी आणि घृष्णेश्वर मंदिरालाही उपराष्ट्रपती भेट देणार आहेत.

**<><><><><>**

राज्य शासनामार्फत नवीन कृषी धोरण आखणार असल्याचं कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी आणि अन्न धान्याच्या बाबतीत महाराष्ट्र स्वंयपूर्ण व्हावा, या उद्देश्यानं हे धोरण आखणार असल्याचं कोकाटे यांनी सांगितलं. काल कोल्हापूर इथं झालेल्या प्रगतशील आणि प्रयोगशील शेतकरी परिसंवादात ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातले शेतकरी उपस्थित होते.

**<><><><><>**

नागपूर इथल्या महिलांनी सुरू केलेल्या सहकारी पतसंस्थेचं यश हे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे झालेला सकारात्मक बदल आहे, असं महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी समाजमाध्यमाद्वारे सांगितलं. ही पतसंस्था तीन हजार महिलांनी एकत्र येऊन स्थापन केली असून ती भक्कमपणे उभी असल्याचं तटकरे म्हणाल्या. महिला आणि बालविकास विभागाच्या माविम आणि इतर उपक्रमांसोबत या पतसंस्थेला जोडून त्यांना मदत केली जाईल, असं आश्वासन तटकरे यांनी दिलं.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी माजी मंत्री अनिल भाईदास पाटील आणि माजी आमदार लहू कानडे यांनी नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची यांनी आज ही घोषणा केली. अनिल पाटील यांच्यावर जळगाव, नंदुरबार आणि धुळे जिल्हा संघटनेच्या प्रभारी पदाची तर लहू कानडे यांच्यावर सामाजिक न्याय विभागाच्या प्रभारी पदाची जबाबदारी सोपवली आहे.

<><><><><>

सर्वसामान्य माणसांच्या भाषेला सामावून घेतलं तरच आपली भाषा अधिकाधिक समृद्ध होईल, असं प्रतिपादन ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा तारा भवाळकर यांनी केलं. नवी दिल्लीच्या तालकटोरा स्टेडियममध्ये उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत संमेलनाच्या उद्घाटनाच्या दुसऱ्या सत्रात त्या काल बोलत होत्या.

मराठी भाषेच्या विकासासाठी दहावीपर्यंतचं शिक्षण मराठीतूनच होण्याची गरज भवाळकर यांनी व्यक्त केली. मराठी भाषेला पुढे नेण्यासाठी मराठी लिहिणारी, बोलणारी, मराठीत व्यवहार करणारी माणसं वाढणं गरजेचं असल्याचंही त्या म्हणाल्या. मराठी साहित्य संमेलनाच्या सुरुवातीच्या दिवसांत ते विशिष्ट वर्गाचं होतं हे मान्य करत आता संमेलनाची व्याप्ती वाढत आहे, असं भवाळकर यांनी नमूद केलं. मराठी भाषेच्या विकासात निरक्षर, परंपरेतून शहाणपण आलेल्या लोकानी मोठं योगदान दिलं असून साक्षरतेच्या जोडीला शहाणपण नसेल तर काही उपयोग नाही, असं त्यांनी सांगितलं.

याप्रसंगी मावळते अध्यक्ष रवींद्र शोभणे यांनीही आपले विचार मांडले. अध्यक्षपदाची सूत्रं तारा भवाळकर यांच्याकडे सोपवताना कृतार्थ वाटतं असं ते म्हणाले. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, माजी

केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे, संमेलनाचे निमंत्रक संजय नहार उपस्थित होते.

**<><><><><>**

जालना जिल्ह्यातल्या जाफराबाद तालुक्यातल्या पासोडी इथं आज पहाटेच्या सुमारास पाच मजुरांचा मृत्यू झाला. पासोडी रस्त्यावरच्या पुलाच्या बांधकामासाठी हे मजूर आले होते आणि पत्र्याची शेड करून राहत होते. अवैध वाळू वाहतुकीच्या टिप्पर चालकानं घाईनं टिप्पर रिकामा करताना झोपलेल्या मजुरांना पाहिलं नाही, आणि त्यांच्यावर वाळू ओतली. त्यामुळे ही दुर्दैवी घटना घडली. वाळूच्या ढिगाऱ्याखालून गावकऱ्यांनी एका लहान मुलीला सुखरूप बाहेर काढलं असल्याचं वृत्त आहे. पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीनं जेसीबीच्या सहायानं वाळू बाजूला घेतली. त्यानंतर मृतदेह पुढच्या तपासणीसाठी पाठवले असून या प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती जालन्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी दिली.

**<><><><><>**

पालघरमधल्या ग्रामस्थांना जबरदस्तीनं वेठबिगारी करायला भाग पाडल्याबद्दल गुजरातमधल्या वीटभट्टी मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडखडकोना-गुरवपाडा गावातल्या पीडितांना नोव्हेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान जबरदस्तीनं वेठबिगार करण्यात आलं असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

अश्लिल व्हिडिओ व्हायरल केल्याप्रकरणी गुजरात पोलिसांनी लातूरमधून प्रज्वल तेली नावाच्या एका व्यक्तीला काल ताब्यात घेतलं आहे. गुजरातमधल्या एका रुग्णालयातले महिलांची तपासणी करतानाचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत.

यातले काही व्हिडिओ हे प्रज्वल यानं समाजमाध्यमांवर अपलोड केल्याचा आरोप आहे. प्रज्वलसह इतर राज्यांतून आणखी दोघांना अटक केली असल्याची माहितीही पोलीसांनी दिली.

**<><><><><>**

अश्लिल व्हिडिओ व्हायरल केल्याप्रकरणी गुजरात पोलिसांनी लातूरमधून प्रज्वल तेली नावाच्या एका व्यक्तीला काल ताब्यात घेतलं आहे. गुजरातमधल्या एका रुग्णालयातले महिलांची तपासणी करतानाचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. यातले काही व्हिडिओ हे प्रज्वल यानं समाजमाध्यमांवर अपलोड केल्याचा आरोप आहे. प्रज्वलसह इतर राज्यांतून आणखी दोघांना अटक केली असल्याची माहितीही पोलीसांनी दिली.

**<><><><><>**

डॉ. होमी भाभा स्टेट विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आता थेट मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रातून दुहेरी पदवीचं शिक्षण घेता येणार आहे. यासंदर्भातील सामंजस्य करार दोन्ही विद्यापीठांत नुकताच झाला. राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ कार्यक्रमात देश-विदेशातल्या जनतेशी आपले विचार मांडणार आहेत. दर महिन्यात शेवटच्या रविवारी प्रसारित होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा ११९ वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, NEWS ON AIR वेबसाईट आणि मोबाईल ॲप वर देखील हा कार्यक्रम प्रसारित केला जाणार आहे. याशिवाय आकाशवाणी न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या

युट्युब वाहिनीवर थेट प्रक्षेपण केलं जाईल. रात्री ८ वाजता या कार्यक्रमाचा मराठी अनुवाद आकाशवाणीवरुन प्रसारित होईल.

<><><><>

शिवजयंतीनिमित्त आयोजित शाहिरी महोत्सवाचा समारोप काल संध्याकाळी अहिल्यानगर इथं झाला. शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीनं आयोजित तीन दिवसाच्या या महोत्सवात विविध ठिकाणच्या शाहिरी पोवाड्यांचं सादरीकरण करण्यात आलं.

<><><><>

शस्त्रबंदी कायम ठेवणं आणि भविष्यात गैरसमज टाळण्यावर भारत आणि पाकिस्तान यांच्यात सहमती झाली आहे. जम्मू - काश्मिरातल्या पूंछमध्ये दोन्ही देशांच्या ब्रिगेड कमांडरच्या बैठकीत ही चर्चा झाली. सुमारे ४ वर्षांनंतर अशा प्रकारची बैठक झाली. नुकतीच झालेली चकमक आणि ताबारेषेवर आढळून आलेल्या बॉम्बची पार्श्वभूमी या बैठकीला होती. दोन्ही देशातला तणाव कमी करण्यासाठी विद्यमान संपर्क यंत्रणांचा प्रभावी वापर करण्याचा निर्णयही दोन्ही देशांनी घेतला.

<><><><>

अमेरिकेत बोस्टन विद्यापीठाच्या वतीनं आयोजित विविध धावण्याच्या स्पर्धेअंतर्गत भारताचा धावपटू गुलवीर सिंग यानं पुरुषांच्या ५००० मीटर इनडोअर शर्यतीत १३ मिनीटांपेक्षा कमी वेळ नोंदवत ऐतिहासिक कामगिरी केली. अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय धावपटू ठरला आहे. गुलवीर यानं १२ मिनिटे ५९ सेकंद आणि ७७ मिलीसेकंदात हे अंतर पार करत, नव्या राष्ट्रीय तसंच आशियाई विक्रमाचीही नोंद केली.

या कामगिरीमुळे गुलवीर याच वर्षी सप्टेंबरमध्ये टोकियो इथं होणाऱ्या विश्व अजिंक्यपद स्पर्धेसाठीही पात्र ठरला आहे.

**<><><><><>**

महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धेत आज यूपी वॉरियर्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. बंगळूरू इथं संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल. या स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्सनं आत्तापर्यंत झालेल्या तीनपैकी दोन सामन्यात विजय मिळवला आहे, यूपी वॉरियर्सनं अद्याप एकही सामना जिंकलेला नाही त्यामुळे ते पहिल्या विजयाच्या प्रतिक्षेत असतील.

//<><><><><>//